| MHWR030016612021 | खटला दाखल तारीख – | ०९.०३.२०२१ |
|---|---|---|
| | खटला नोंदणी तारीख – | ०९.०३.२०२१ |
| | खटला निकाल तारीख– | २८.०७.२०२६ |
| | कालावधी – ०५ वर्ष, ०४ महिने, १९ दिवस. | |

**भाग –' अ '**

**Form No. XXXII**

**(Title Page of the Judgment)**

**(Para 44 (i) of Chapter VI of Criminal Manual)**

## न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी (न्यायालय क्र.२), वर्धा, यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी – श्रीमती एम.आर.चव्हाण–हिवराळे)

**नियमित फौजदारी खटला क्र. १८०/२०२१** **अपराध क्र. ५१७/२०२०**
[MHWR030016612021] **निशाणी क्र. २७**

महाराष्ट्र शासन तर्फे }
पोलीस निरीक्षक, }
पोलीस स्टेशन, सेवाग्राम, }
ता. व जि. वर्धा. } ... अभियोग पक्ष.

**–वि रु ध्द–**

कृष्णा नामदेवराव शेगोकर, }
वय – ५७ वर्षे, व्यवसाय — मजुरी }
राहणार – पुजई, ता. जि. वर्धा. }
ह.मु. ज्ञानेश्वर नगर, मसाळा, ता. जि. वर्धा. } ... आरोपी.

.......................................................................................................................

सरकारी अभियोक्ता सरकार पक्षातर्फे श्रीमती डी. पी. कोठारी.

श्री. डी. एन. हिवरे, विधीज्ञ आरोपीतर्फे

.......................................................................................................................

## दोषारोप – भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२४, ५०४ व ५०६ अन्वये.

### भाग –' ब '

### (Para 44 (ii) of Chapter VI of Criminal Manual)

| | | |
|---|---|---|
| १) | गुन्हा घडल्याचा दिनांक | १८.११.२०२० |
| २) | प्रथम खबर अहवाल दिनांक | १८.११.२०२० |
| ३) | दोषारोप पत्र दाखल झाल्याचा दिनांक | ०९.०३.२०२१ |
| ४) | दोषारोप निश्चिती दिनांक | ०२.०८.२०२२ |
| ५) | पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | १०.११.२०२२ |
| ६) | न्यायनिर्णय राखीव केल्याचा दिनांक | १८.०७.२०२६ |
| ७) | न्यायनिर्णयाचा दिनांक | २८.०७.२०२६ |

### आरोपीचा तपशील

| आरोपीची श्रेणी | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामीन दिनांक | गुन्ह्याचे कलम | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा सुनावली | बंदीवान म्हणून असलेला कालावधी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४२८ प्रमाणे. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | कृष्णा नामदेवराव शेगोकर | ०५.१२.२०२० | ०५.१२.२०२० | भा.दं.वि. कलम ३२४, ५०४ व ५०६ | दोषी कलम ३२४ भा.दं.वि. करीता. | होय. | नियमाप्रमाणे. |

## भाग –' क'

## (Para 44 (iii) of Chapter VI of Criminal Manual)

## LIST OF PROSECUTION/DEFENCE/COURT WITNESSES

**अ. अभियोग पक्ष –**

| अनु.क्र. | साक्षीदारांची नांवे | निशाणी | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|---|
| १) | ऋषीकेश गजानन नेहारे | ०५ | पंच |
| २) | चिणबाजी मारोतराव भोंडे | ०७ | साक्षीदार |
| ३) | विनोद नामदेवराव शेगोकर | ०९ | फिर्यादी |
| ४) | शरद शामरावजी भोंबले | १२ | साक्षीदार |
| ५) | सुनिल महादेवराव पाऊलझाडे | १३ | तपासी अधिकारी |

**ब. बचाव पक्षाचे साक्षीदार जर असतील तर –**

| अनु. क्र. | नांवे | निशाणी | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|---|
| --- | --- | --- | --- |

**क. न्यायालयीन साक्षीदार असतील तर -**

| अनु. क्र. | नांवे | निशाणी | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|---|
| --- | --- | --- | --- |

## निशाणी कागदपत्रांची यादी

**ड. अभियोग पक्ष -**

| अनु. क्र. | कागदपत्रे | निशाणी क्र. |
|---|---|---|
| १) | फिर्याद | १० |
| २) | प्रथम खबर अहवाल | ११ |
| ३) | सूचनापत्र | १४ |
| ४) | घटनास्थळ पंचनामा | १५ |

| | | |
|---|---|---|
| ५) | साक्षीदारांचे बयाणातील अधोरेखांकित भाग–अ | १६ ते १८ |

**इ. बचाव पक्ष -**

| अनु. क्र. | कागदपत्रे | निशाणी क्र. |
|---|---|---|
| ––– | ––– | ––– |

**ई. भौतीक वस्तु -**

| अनु. क्र. | भौतिक वस्तु क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १) | वस्तु क्र.–अ | काडी |

# न्यायनिर्णय

( घोषित दिनांक : २८/०७/२०२६ )

आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२४, ५०४ व ५०६ अन्वये खटला चालविण्यात आला.

२. **सरकार पक्षाचे प्रकरण थोडक्यात खालील प्रमाणे आहेः**

फिर्यादी विनोद नामदेवराव शेगोकर यांची मौजा पुजई येथे शेती असुन त्यांच्या शेताच्या उत्तरेस आरोपीची शेती आहे. फिर्यादी व आरोपी हे सख्खे भाऊ आहेत. फिर्यादी व आरोपी यांच्यात शेतातील रस्त्याबाबत वाद आहे. दिनांक १८/११/२०२० रोजी दुपारी १२.०० वाजेच्या दरम्यान फिर्यादी हे त्यांचा मुलगा वैभव याचेसोबत त्यांच्या शेतात गेले होते. फिर्यादीने त्यांच्या शेतात काम करणारा चिंधुजी भोंडे याला शेतातील ओलीत करण्याचे पाईपचे बेंड कोणी नेले असे विचारले असता, आरोपी त्याच्या हातात काडी घेवून तेथे आला. आरोपीने फिर्यादीला 'तु मला काऊन शिवीगाळ करतो' असे म्हणुन त्याच्या

हातातील निंबाचे काडीने फिर्यादीला मारहाण केली. त्यामुळे फिर्यादीच्या डोक्याला वरच्या भागाला जखम झाली व रक्त निघाले. त्यावेळी फिर्यादीच्या मुलाने आरडाओरड केल्याने शेतात काम करणारे मजुर धावत आले. त्यानंतर फिर्यादी यांनी त्यांच्या साळ्याला फोन करुन बोलाविले. आरोपी हा नेहमी फिर्यादीला शेतातील रस्त्याचे कारणावरुन शिवीगाळ करुन धमकी देत असतो. सदरहू फिर्यादीने आरोपीविरुद्ध पोलीस स्टेशनला तक्रार नोंदवली.

३. फिर्यादीच्या तक्रारीनुसार पोलीस ठाणे, सेवाग्राम येथे अप. क्र.५१७/२०२० भा.दं.वि. कलम ३२४, ५०४ व ५०६ नुसार गुन्ह्याची नोंद झाली व गुन्हा तपासात घेण्यात आला. तपासकामी तपासी अधिकारी यांनी घटनास्थळ व जप्ती पंचनामा करून साक्षीदारांचे बयान नोंदविले. तपासाअंती त्यांनी आरोपीविरूध्द वरील कलमांतर्गत दोषारोपपत्र दाखल केले.

४. माझे पूर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपीविरूध्द भा.दं.वि. कलम ३२४, ५०४ व ५०६ खालील दंडनिय अपराधाकरीता नि.क्र. ३ प्रमाणे दोषारोप निर्धारित केले. आरोपीने त्याला गुन्हा कबुल नसल्याचे कथन नि.क्र.४ अन्वये केले व खटला चालविण्याची मागणी केली. हवे तितके साक्षीदार झाल्यानंतर अभियोग पक्षाचा पुरावा बंद केला. आरोपीचे कलम ३१३ (१ब) फौजदारी प्रक्रिया संहिता अंतर्गत बयाण नि.क्र. १९ खाली नोंदविण्यात आले. त्यात आरोपीने सदरचे प्रकरण खोटे असल्याचा बचाव घेतल्याचे दिसून येते.

५. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला. सरकारी अभिवक्ता श्रीमती कोठारी यांनी अभिलेखाप्रमाणे युक्तिवाद केला असून आरोपीचे वकील श्री. हिवरे यांनी आरोपीविरुद्ध

पुरावा न आल्यामुळे त्याला निर्दोष बरी करण्यात यावे, अशी विनंती या न्यायालयापुढे केलेली आहे. सदर प्रकरणाच्या तथ्य व कथनानुसार खालील मुद्दे या न्यायालयापुढे न्यायनिवाडाकरीता विचारार्थ उपस्थित झालेले असून त्यांचे निष्कर्ष कारणेमिमांसा खालील प्रमाणे नोंदविण्यात आलेले आहे –

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे का की, दिनांक १८/११/२०२० रोजी दुपारी १२.३० ते १.०० वाजेच्या दरम्यान मौजा पुजई शेत शिवार, वर्धा आरोपीने फिर्यादीला लाकडी काठीने मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत पोहचविली, आणि त्याव्दारे आरोपीने भारतीय दंड विधान कलम ३२४ अन्वये शिक्षेसपात्र गुन्हा केला? | **होकारार्थी..** |
| २. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे का की, उपरोक्त तारखेला, वेळी व ठिकाणी आरोपीने उद्देशपूर्वक शांतताभंग घडवून आणण्याच्या उद्देशाने शिवीगाळ करून फिर्यादीचा अपमान केला आणि त्यायोगे त्यांना प्रक्षोभीत केले व त्यामागे त्यांच्या हातून अपराध घडावा असा त्याचा उद्देश होता, आणि त्याव्दारे आरोपीने भारतीय दंड विधान कलम ५०४ अन्वये शिक्षेसपात्र गुन्हा केला? | **नकारार्थी..** |
| ३. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले आहे का की, उपरोक्त तारखेला, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीला त्यांच्या मनात भिती उत्पन्न करण्याच्या उद्देशाने जिवे मारण्याची धमकी दिली व फौजदारी पात्र धाकदपटशा दाखविला, आणि त्याव्दारे आरोपीने भारतीय दंड विधान कलम ५०६ अन्वये शिक्षेसपात्र गुन्हा केला ? | **नकारार्थी..** |

| | | |
|---|---|---|
| ४. | आदेश काय ? | **आरोपीला कलम ३२४ भा.दं.वि. करीता दोषी धरण्यात आले आणि इतर आरोपातुन निर्दोष मुक्त करण्यात आले.** |

## का र ण मि मां सा

**मुद्दा क्रं. १ करीता –**

**६.** सदर प्रकरणात आरोपीविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ३२४, ५०४ व ५०६ अन्वये गुन्हा असल्याने सदर कलमांची आवश्यक तत्वे सिध्द करण्याची जबाबदार अभियोग पक्षावर भारतीय साक्षी पुरावा अधिनियम कलम १०१[1] व १०२[2] अन्वये आहे.

**७.** सदर प्रकरणात अभियोग पक्षाने त्यांचे कथन सिध्द करण्याकरिता वर नमुद यादीप्रमाणे साक्षदार तपासलेले आहेत. सा.क्र.३ फिर्यादी विनोद शेगोकर नि.क्र. ०९ यांना तपासलेले आहे. त्यांनी त्यांच्या सरतपासामध्ये त्यांच्या तक्रारी मधील कथनांची पुनरावृत्ती केलेली आहे. तसेच त्यांनी त्यांची तोंडी तक्रार व छापील प्रथम खबरी अहवाल यांना नि.क्र.१० व ११ अन्वये सिद्ध केलेले आहे. त्यांनी त्यांच्या सरतपासामध्ये कथन केले की, घटना २०२० मध्ये सकाळी ११.०० ते १२.०० वाजेच्या दरम्यान त्यांच्या शेतात घडली.

1 ***भारतीय साक्षी पुरावा अधिनियम, १८७२ चे कलम १०१ – शाबीतीची जबाबदारी –*** *जेव्हा कोणतेही न्यायीक प्रकरणात कुठल्याही पक्षाकडून अशी अपेक्षा किंवा मागणी असते की, न्यायीक नियमानुसार खटल्याचा निकाल कुठल्या नियमानुसार किंवा कुठल्या आधारे त्याचे बाजुला आहे अशा वेळी त्या पक्षाला शाबित करणे गरजेचे आहे की त्याची बाजु कोणते आधारावर हे आणि तशी बाजू न्यायालयाने मान्य केली पाहिजे.*

2 ***भारतीय साक्षी पुरावा अधिनियम, १८७२ चे कलम १०२ – शाबीतीची जबाबदारी कोणावर असते –*** *कोणतेही न्यायीक प्रकरणात, शाबीतीची जबाबदारी, वेगळ्या वेगळ्या पक्षाला वेगळया वेगळ्या प्रकरणात असते.*

ते शेतात पाणी ओलवित होते तेव्हा आरोपी त्यांच्या शेतातून जात होता. त्यांनी आरोपीला 'माझे शेतातून रस्ता नाही तु जावू नको' असे म्हटले असता आरोपीने त्यांना काडीने डोक्यावर मारले. त्यामुळे त्यांच्या डोक्यातून रक्त निघाले. आरोपीने त्यांना शिवीगाळ सुध्दा केली. त्यानंतर त्यांनी त्यांच्या साळयाला फोन केला. ज्या काडीने त्यांना मारहाण केली होती ती वस्तु क्र.–अ वर असल्याचे त्यांनी ओळखले आहे. त्यांनी उलट तपासामध्ये मान्य केले आहे की, त्यांची शेती वडीलोपार्जित आहे. आरोपी त्यांचा भाऊ असुन त्याची शेती त्यांच्या शेताचे उत्तर–पूर्व दिशेला आहे. त्यांनी त्यांच्या बयाणातील अधोरेखांकित भाग–अ पोलिसांना सांगितला नव्हता व तो पोलिसांनी त्यांच्या बयाणात का लिहिला याचे कारण मी सांगू शकले नाही. त्यावेळी त्यांचा रोजदार चिंनबाजी भोंडे, अंजनाबाई, शिवाणी व देठेवाई हे हजर होते. पोलिसांनी त्यांचे रक्ताने भरलेले शर्ट जप्त केले होते.

८. सा.क्र.२ चिणबाजी भोंडे नि.क्र.०७ हे फिर्यादीचे शेतात काम करणारे मजुर आहे. त्यांच्या सरतपासात असे आले आहे की, ते फिर्यादीकडे नोकर म्हणुन काम करीत होते. आरोपीचे शेत फिर्यादीच्या शेताला लागुन आहे. घटना फिर्यादीचे शेतात घडली होती. धु–याचे कारणावरुन आरोपी व फिर्यादी यांचा वाद चालु होता. परंतु काय झाले हे त्यांना माहिती नाही. पोलिसांनी त्यांचे बयाण घेतले नाही. सदर साक्षीदाराने घटनेबाबत अभियोग पक्षास समर्थन दर्शविलेल नाही. परंतु तपासी अधिकारी यांनी त्यांच्या सरतपासामध्ये सदर साक्षदारांनी त्यांचे बयाण त्यांच्या म्हणण्याप्रमाणे नोंदविले आणि त्यांचे बयाणातील अधोरेखांकित भाग–अ नि.क्र.१७ अन्वये सिध्द केलेले आहे. ते खालीलप्रमाणे आहे –

> *दिनांक १८/११/२०२० रोजी दुपारी १२.३० वा. चे दरम्यान मी मालक विनोद नामदेवराव शेगोकर यांचे शेतातील चण्याला पाणी देण्याचे काम करत होतो त्यावेळी मालक विनोद शेगोकर हे*

*मला म्हणाले कि, ओलीत करण्याचे पाईपाचे वेंड कोणी नेले असे विचारले म्हणुन मी त्यांना म्हटले कि, मुत्रा माहीती नाही त्यावेळी कृष्णा शेगोकर हे हातात विहीरीजवळ काठी घेवुन आले व मालक विनोद शेगोकर यांना म्हणाले कि, तु मला शिवीगाळ का करतो असे म्हणुन कृष्णा शेगोकर याने त्याचे ', हातातील काठीने विनोद शेगोकर यांचे डोक्यावर मारले त्यामुळे त्याचे डोके फुटले व कृष्णा शेगोकर यांनी विनोद शेगोकर यांना शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिली. त्यानंतर त्यांनी त्यांचा साळा यांना फोन केला होता व तो आल्यावर त्याचे सोबत पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिल्याचे माहीती झाले.*

सबब, या साक्षदाराचे साक्ष कथन त्याने केलेला सरतपास व त्याच्या बयाणातील अधोरेखांकित भाग–अ नि.क्र. १७ इतपत गृहीत धरण्यात येतो.

९. सा.क्र.४ शरद भोंबले नि.क्र.१२ हे अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहे. सदर साक्षीदाराने घटनेबाबत अभियोग पक्षास समर्थन दर्शविलेल नाही. परंतु तपासी अधिकारी यांनी त्यांच्या सरतपासामध्ये सदर साक्षदारांनी त्यांचे बयाण त्यांच्या म्हणण्याप्रमाणे नोंदविले आणि त्यांचे बयाणातील अधोरेखांकित भाग–अ नि.क्र.१८ अन्वये सिध्द केलेले आहे. ते खालीलप्रमाणे आहे –

*दिनांक १८/११/२०२० रोजी दुपारी १२.३० वा. चे दरम्यान दरम्यान मी मालक अमीत शेगोकर यांचे शेतात बैल चारत असतांनी मला विनोद शेगोकर व त्यांचा भाऊ कृष्णा शेगोकर यांचे भांडणाचा आवाज आला म्हणुन मी विनोद शेगोकर यांचे विहीरीजवळ जावुन पाहीले तेव्हा विनोद नामदेवराव शेगोकर*

*यांना कृष्णा शेगोकर हे तु शिवीगाळ का करतो असे म्हणुन कृष्णा शेगोकर याने त्याचे – हातातील काठीने विनोद शेगोकर याचे डोक्यावर मारले त्यामुळे त्यांचे डोके फुटले होते त्यानंतर ते 'तेथुन निघुन गेले व विनोद शेगोकर हे काही वेळाने त्यांचे साळ्या सोबत जावुन पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिल्याचे माहीती झाले.*

सबब, या साक्षदाराचे साक्ष कथन त्याने केलेला सरतपास व त्याच्या बयाणातील अधोरेखांकित भाग–अ नि.क्र.१८ इतपत गृहीत धरण्यात येतो.

**१०.** अभियोग पक्षाने जप्ती पंच सा.क्र.१ ऋषीकेश नेहारे नि.क्र.०५ याची साक्ष नोंदविली. परंतु सदर साक्षीदाराने त्याच्या साक्ष कथनामध्ये अभियोग पक्षाच्या कथनास फितूरी दर्शविली आहे. पोलिसांनी त्याला पंच म्हणुन बोलाविले नव्हते. जप्ती पंचनाम्यावरील त्यांची सही नि.क्र.०६ अन्वये त्याने ओळखली, परंतू त्यातील मजकुर माहीत नसल्याचे सांगितले. सबब, त्यांची साक्ष केवळ त्यांच्या सदर पंचनाम्यावरील स्वाक्षरी इतपत सिध्द झालेली आहे असे गृहीत धरण्यात येते.

**११.** सदर प्रकरणामध्ये सा.क्र.१ ऋषीकेश नेहारे नि.क्र.०५, सा.क्र.२ चिणबाजी भोंडे नि.क्र.०७ व सा.क्र.४ शरद भोंबले नि.क्र.१२ यांच्या साक्ष कथनात विसंगत कथन अभिलेखावर सिध्द झालेले आहे. ते इतर पुराव्याअन्वये अभियोग पक्षाचे कथन पडताळुन बघता दुजोरा देणारे आहे. सबब, ***तहसिलदार सिंह विरुध्द उत्तर प्रदेश राज्य***[3] यामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने असे निर्देशित केल्याप्रमाणे आहे की, ''कुठलेही विसंगत विरोधात्मक कथन जो कुठलाही पक्ष सिध्द करेल ते त्याचे वतीने वाचण्यात येईल.'' सबब, सदर साक्षदारांचे साक्ष कथन विसंगती उत्पन्न करणारे असुन ते अभियोग पक्षाच्या कथनास दुजोरा

3 (1959 AIR 1012)

देणारे आहे. ते अभियोग पक्षाच्या इतर पुराव्याअन्वये गृहीत धरण्यात येते.

**१२.** सा.क्र.५ सुनिल पाऊलझाडे नि.क्र.१३ हे या प्रकरणातील तपासी अधिकारी आहे. त्यांनी त्यांच्या सरतपासामध्ये त्यांना या गुन्ह्याचा तपास मिळाला होता, त्यांनी पंचाना नि.क्र.१४ अन्वये सुचनापत्र दिले, फिर्यादीने दाखविल्याप्रमाणे घटनास्थळ पंचनामा नि.क्र.१५ तयार केला आणि तो खरा व बरोबर आहे. पुढे त्यांनी सा.क्र.३ फिर्यादी विनोद शेगोकर, सा.क्र.२ चिणबाजी भोंडे व सा.क्र.४ शरद भोंबले यांचे बयाण त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले असे कथन केले आणि त्यांच्या बयाणातील अधोरेखांकित भाग–अ अनुक्रमे नि.क्र.१६ ते १८ अन्वये सिध्द केले आहे. त्यांनी घटनास्थळावरुन गुन्ह्यात वापरलेली काठी दोन पंचांसमक्ष जप्त केली. त्यांनी आरोपीला ओळखले असून आरोपीविरूध्द दोषारोप पत्र दाखल केले आहे. त्यांनी त्यांच्या उलटतपासणीत विसंगत कथन फेटाळले आहे. सदर साक्षदार हा कार्यालयीन साक्षदार आहे. त्याचे विरूध्द आक्षेपार्ह कुठलेही कथन अभिलेखात सिध्द झालेले नाही आणि त्यांचे साक्ष कथन त्यांच्या तपासाच्या अनुषंगाने स्थिर राहलेले आहे.

**१३.** सदर प्रकरणामध्ये स्विकृतरित्या आरोपी हा फिर्यादीचा सख्खा भाऊ आहे. सबब, आरोपीच्या ओळखी प्रित्यर्थ कुठलेही प्रश्नचिन्ह उद्भवत नाही. सदर प्रकरणामध्ये घटनेच्या पुर्वीपासुन फिर्यादी व आरोपी यांच्यात शेतातील रस्त्याचे कारणावरुन वाद होता, हे देखील स्वीकृत कथन आहे. सबब, भारतीय साक्षी पुरावा अधिनियमाचे कलम ५८ अन्वये ते सिध्द करणे अनिवार्य नाही.

**१४.** सदर प्रकरणामध्ये अभियोग पक्षाच्या कथनानुसार आरोपीने फिर्यादीला

डोक्यावर काठीने मारून जखमी केलेले आहे. याबाबत फिर्यादी सा.क्र.३ विनोद शेगोकर नि.क्र. ०९ यांनी त्यांच्या सरतपासात कथन केलेले आहे की, आरोपी त्यांच्या शेतातुन जात होता. त्यांनी आरोपीला तू माझ्या शेतातुन जाऊ नको असे म्हटले असता आरोपीने त्यांना काडीने डोक्यावर मारले. तसेच आरोपीने त्यांना शिवीगाळ देखील केली होती. याबाबत त्यांनी त्यांची तक्रार व छापील प्रथम खबरी अहवाल यांना अनुक्रमे नि.क्र. १० व ११ अन्वये सिद्ध केलेले आहे. तसेच त्यांनी सदर प्रकरणातील जप्त काठी वस्तु क्र.–अ अन्वये ओळखलेली आहे. त्यांनी त्यांच्या उलट तपासामध्ये स्वीकृत केलेले आहे की, त्यांनी त्यांच्या बयानातील अधोरेखांकित भाग–अ पोलिसांना सांगितला नव्हता. त्यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, फिर्यादी व आरोपी यांचेत पिकाच्या नुकसानीवरून आणि धु–याचे कारणावरून नेहमीच वाद होत असतो.

**१५.** सा.क्र.५ सुनिल पाऊलझाडे नि.क्र.१३ हे या प्रकरणातील तपासी अधिकारी आहे. त्यांनी त्यांच्या सरतपासामध्ये फिर्यादीच्या बयाणातील अधोरेखांकीत भाग–अ नि.क्र.१६ अन्वये सिद्ध केलेला आहे. परंतु सदर नि.क्र.१६ मधील भाग सदर प्रकरणांमध्ये गृहीत धरल्यास तो भारतीय पुरावा कायदा कलम ८[4] अन्वये सदर घटनेचे मागील कारण सिद्ध करण्याकरिता उपयुक्त आहे आणि त्या अन्वये अभियोग पक्षाचे कथन की, आरोपी व फिर्यादी यांच्यात शेतातील रस्त्याच्या कारणावरून वाद होता हे सिद्ध होते.

**१६.** फिर्यादी सा.क्र.३ विनोद शेगोकर नि.क्र. ०९ यांनी त्यांच्या सरतपासामध्ये

4 *८. **जे कोणत्याही वादतथ्याच्या किंवा संबद्ध तथ्याच्या हेतूचे किंवा पूर्वतयारीचे दर्शक किंवा घटक असते** असे कोणतेही तथ्य संबद्ध असते. कोणत्याही दाव्याच्या किंवा कार्यवाहीच्या संबंधात, अथवा त्यातील एखाद्या वादतथ्याच्या किंवा त्याच्याशी संबद्ध अशा तथ्याच्या संबंधात अशा दाव्यातील किंवा कार्यवाहीतील एखाद्या पक्षकाराने अथवा त्याच्या एखाद्या अभिकर्त्याने केलेल्या वर्तनाचा आणि जिच्याबाबत घडलेला एखादा अपराध हा एखाद्या कार्यवाहीचा विषय आहे अशा कोणत्याही व्यक्तीच्या वर्तनाचा एखाद्या तथ्यावर प्रभाव पडत असेल अथवा एखाद्या तथ्याचा अशा वर्तनावर प्रभाव पडत असेल तर, ते वर्तन संबद्ध असते– मग असा प्रभाव पूर्वी पडलेला असो वा नंतर पडलेला असो.*

पुढे स्वीकृत केले आहे की, घटनेच्या वेळी चिणबाजी भोंडे हा हजर होता. अभियोग पक्षाने सा.क्र.२ चिणबाजी भोंडे यांना नि.क्र.०७ अन्वये तपासलेले आहे. त्यांनी त्यांच्या सरतपासाणीत असे स्वीकृत केलेले आहे की, ते फिर्यादीच्या घरी नोकर म्हणून काम करीत होते. ते आरोपीला ओळखतात कारण फिर्यादी व आरोपीचे शेत लागुन आहे. धु–याच्या कारणावरून फिर्यादी व आरोपी यांच्यात वाद असल्याचे देखील त्यांनी नमूद केले आहे. इतर काय झाले हे त्यांना माहिती नाही. त्या मुद्दयावर सरकारी अधिवक्ता यांनी सदर साक्षीदारास उलटतपासणीस पात्र केलेले आहे. त्यांनी त्यांच्या बयाणातील अधोरेखांकीत भाग–अ पोलिसांना बयान देतेवेळी सांगितला नव्हता असे कथन केले असून त्याचे कारण देखील त्यांनी सांगितलेले नाही.

**१७.** त्याबाबत तपासी अधिकारी सा.क्र.५ सुनिल पाऊलझाडे नि.क्र.१३ यांनी त्यांच्या सरतपासामध्ये सदर साक्षदाराच्या बयानातील अधोरेखांकीत भाग–अ हा नि.क्र.१७ अन्वये सिद्ध केलेला आहे. सदर बयाणाप्रमाणे घटना दिनांक १८/११/२०२० रोजी दुपारी १२.३० वाजताचे दरम्यान फिर्यादी यांच्या शेतामध्ये घडलेली आहे. त्यावेळी ओलीत करण्याचे पाईपांचे बेंड कोणी नेले, या कारणावरून फिर्यादी व आरोपी यांच्यात वाद झाला व आरोपीने फिर्यादीच्या डोक्यावर काठीने मारले व त्यामुळे फिर्यादीला रक्ताची जखम झाली, असे कथन आहे. सदर कथन फिर्यादी सा.क्र.३ विनोद शेगोकर नि.क्र. ०९ तर्फे अभियोग पक्षाने रितसर अभिलेखावर सिद्ध केलेले आहेत. आरोपीला संधी असतानाही सदर साक्षीदाराला या मुद्दयावर उलटतपासास पात्र केलेले नाही. त्यामुळे ते जसेच्या तसे गृहीत धरण्यात येते. सदर कथन हे फिर्यादीच्या कथनाला दुजोरा देणारे *(corroborative)* आहे की, घटनेच्या दिवशी कृष्णा शेगोकार म्हणजेच आरोपीने फिर्यादीला काठीने डोक्यावर मारले.

**१८.** आरोपीचे कलम ३१३ (१ब) फौजदारी प्रक्रिया संहिता अंतर्गत असलेले बयाण नि.क्र. १९ चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, आरोपीने त्यातील

> *प्रश्न क्र.२ मध्ये सा.क्र.२ चिणबाजी भोंडे हे फिर्यादीचे नोकर आहेत, ते शेतावर काम करतात, घटनेच्या वेळी ते फार दूर होते आणि त्याचे व फिर्यादीचे शेताबाबत वाद आहे, असे त्याने स्वीकृत केले आहे. तसेच त्याने प्रश्न क्र.५ ला असे उत्तर दिले आहे की, फिर्यादीने त्यांना शिवीगाळ केली होती. प्रश्न क्र.४ ला त्याने उत्तर दिले आहे की, घटना शेतात घडली होती, परंतु त्याने फिर्यादीला मारले नाही व फिर्यादीनेच त्याला शिवीगाळ केली होती.*

**१९.** सदर प्रश्नांच्या उत्तरावरून आरोपीने घटनास्थळ व घटनेच्या वेळी घटनास्थळावरील त्याची हजेरी स्वीकृत केलेली आहे. तसेच त्यावेळी फिर्यादी व आरोपी यांच्यात शेताच्या कारणावरून वाद झाला होता आणि सा.क्र.२ चिणबाजी भोंडे नि.क्र.०७ हे घटनास्थळाच्या आसपास उभे होते, इथपतचे कथन आरोपीने स्वीकृत केलेले आहे. तसेच आरोपीने कथन केले आहे की, फिर्यादीने त्याला शिवीगाळ केली होती. परंतु त्याबाबतची कुठलीही विसंगत तक्रार आरोपीने न्यायालय समक्ष दाखल केलेली नाही किंवा पोलीस स्टेशनला देखील गुन्हा दाखल होईल असा प्रथम खबरी अहवाल देखील दाखल केलेला नाही किंवा असा त्याचा बचाव देखील नाही. सबब, वर नमूद विवेचनावरुन या प्रकरणामध्ये अभियोग पक्षाने घटना, घटनास्थळ, घटनेच्या वेळी घटनास्थळी आरोपी हजर असणे आणि फिर्यादी व आरोपी यांचे मधील वाद, हे कथन वाजवी शकेच्या पलीकडे सिद्ध केलेले आहेत.

**२०.** अभियोग पक्षाच्या कथनानुसार आरोपीने फिर्यादीला काठीने डोक्यावर मारले

आणि त्यांना रक्ताची जखम झाली. याबाबत घटनास्थळ पंचनामा नि.क्र.१४ यावरील पंच सा.क्र.१ ऋषीकेश गजानन नेहारे नि.क्र.०५ याने त्याच्या पुराव्यात घटनास्थळ पंचनाम्यावरील मजकूर फेटाळलेला आहे. परंतु त्याने त्यावरील त्याची सही नि.क्र.६ अन्वये स्वीकृत केलेली आहे. यावरून सदर प्रकरणातील तपासी अधिकारी सा.क्र.५ सुनिल पाऊलझाडे नि.क्र.१३ यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १०० सह कलम ४ अंतर्गत घटनास्थळ पंचनामा हा स्वतंत्र इसमांच्या हजेरीत तयार केला इथपतचे कथन न्यायालयापुढे सिद्ध झालेले आहे. त्याचप्रमाणे तपासी अधिकारी सा.क्र.५ सुनिल पाऊलझाडे नि.क्र.१३ यांनी त्यांच्या साक्ष कथनामध्ये स्पष्टपणे कथन केले आहे की, त्यांनी घटनास्थळ पंचनामा स्वतः तयार केलेला आहे. तसेच त्या बाबतचे सूचना पत्र देखील त्यांनी पंचांना दिलेले आहे. त्यांनी त्याबाबतचे सूचना पत्र नि.क्र.१४ व घटनास्थळ पंचनामा नि.क्र.१५ मधील कथन स्वतः अभिलेखावर सिद्ध केलेले आहे. त्याबाबत आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलट तपासामध्ये कुठलीही विसंगती आढळून आलेली नाही. त्यामुळे अभियोग पक्षाने ते जसेच्या तसे अभिलेखावर सिद्ध केले आहे.

**२१.** त्याचप्रमाणे तपासी अधिकारी सा.क्र.५ सुनिल पाऊलझाडे नि.क्र.१३ यांच्या कथना अन्वये त्यांनी घटनास्थळावरूनच एक काठी जप्त केलेली आहे. ती दोन पंचांसमक्ष जप्त केलेली आहे. ती काठी वस्तु क्र.–अ अन्वये त्यांनी ओळखलेली आहे. त्याबाबत देखील कुठलीही विसंगती त्यांच्या उलट तपासामध्ये आलेली नाही. सदर काठी ही फिर्यादी सा.क्र.३ विनोद शेगोकर नि.क्र. ०९ यांनी देखील त्यांच्या सर तपासामध्ये ओळखलेली आहे. जरीही या प्रकरणातील सा.क्र.२ चिणबाजी भोंडे नि.क्र.०७ व सा.क्र.४ शरद भोंबले नि.क्र.१२ यांनी अभियोग पक्षाला सहाय्य केलेले नाही, तरीही त्यांच्या साक्ष कथनांमधील विसंगती अभिलेखावर सिद्ध झालेली आहे. त्यावरून देखील आरोपीने गुन्ह्यात वापरलेली

काठी जप्त झाली, हे कथन जसेच्या तसे अभिलेखावर सिद्ध झालेले आहे. अभियोग पक्षाने त्या काठीची जप्ती व त्या काठीची ओळख अभिलेखावर जसेच्या तसे सिद्ध केलेली आहे. सबब, अभियोग पक्षाच्या कथनानुसार गुन्ह्यात वापरण्यात आलेली काठी ही अभिलेखावर सिद्ध झाली आहे, असे न्यायालयाचे मत आहे.

२२. फिर्यादी सा.क्र.३ विनोद शेगोकर नि.क्र. ०९ यांनी त्यांच्या सरतपासामध्ये कथन केलेले आहे की, त्यांनी आरोपीला हटकल्यास त्याने त्याच्या हातातील काडीने त्यांच्या डोक्यावर मारले व त्यामधून रक्त निघाले. सा.क्र.२ चिणबाजी भोंडे नि.क्र.०७ व सा.क्र.४ शरद भोंबले नि.क्र.१२ यांच्या कथनानुसार देखील आरोपीने फिर्यादीला काठीने डोक्यावर मारलेले होते. तसेच तपासी अधिकारी सा.क्र.५ सुनिल पाऊलझाडे नि.क्र.१३ यांनी नि.क्र.१५ अन्वये सिद्ध केलेला घटनास्थळ पंचनामा ज्यामध्ये एक लिंबाचे झाडाची काठी जी १३ सेंटीमीटर असून १० सेंटीमीटर रुंद आहे, ती काठी कुणालाही दुखापत पोहोचवण्यास सक्षम आहे ही बाब अभिलेखावरील काठीच्या वर्णनावरुन व कुठल्याही सतसतविवेक बुध्दी असणा–या व्यक्तीला पटणारे आहे. फिर्यादी सा.क्र.३ विनोद शेगोकर नि.क्र. ०९ यांचा उलटतपास घेतेवेळी आरोपीच्या वकिलांनी फिर्यादीला विचारलेल्या विसंगत प्रश्नांमध्ये त्यांनी स्वीकृत केले आहे की, रक्ताने माखलेले फिर्यादीचे शर्ट जप्त करण्यात आले होते. यावरून फिर्यादीला झालेली जखमी रक्ताची होती, इतपतचे कथन आरोपीच्या वकिलांनी केलेल्या प्रश्नांवरून त्यांनी स्वीकृत केल्याचे स्पष्ट होते.

२३. यात शंका नाही की, सदर प्रकरणामध्ये अभियोग पक्षाने वैद्यकीय अधिकारी यांना तपासलेले नाही किंवा त्याबाबतचा दस्तऐवजीक पुरावा देखील सिध्द केलेला नाही. परंतू कायदयाचे सिध्द तत्व आहे की, अभिलेखावरील इतर पुराव्यावरून पिडितास झालेली

जखम सिध्द झाल्यास केवळ वैद्यकीय अधिकारी तपासण्यात आलेले नाही म्हणून अभियोग पक्षाचे कथनामध्ये संशय उत्पन्न होतो आणि त्याचा फायदा आरोपींना देण्यात येतो असे नाही. या न्यायालयाचे सदर मत मा. सर्वोच्च न्यायालय यांनी ***<u>सोलंकी चिमनभाई उकाभाई ..वि.. गुजरात राज्य</u>*** [5] या न्यायनिर्णयामध्ये बळकट केले आहे. सदर न्यायनिर्णयामध्ये असे निर्देशित करण्यात आले आहे की, ''ज्यावेळी वैद्यकीय पुरावा हा प्रत्यक्षदर्शी पुराव्यासोबत विसंगती उत्पन्न करणारा असेल किंवा ज्यावेळी प्रत्यक्ष पुरावा हा स्वीकृत व बळकट स्वरुपात असेल त्यावेळी वैद्यकीय पुराव्याऐवजी प्रत्यक्षदर्शी पुरावा हा महत्वाचा व विश्वासपात्र ठरतो.''

**२४.** त्याचप्रमाणे भा.दं.वि. कलम ३२४ अन्वये नमुद असलेली दुखापत ही भा.दं.वि. कलम ३१९ मध्ये असलेली दुखापत होय. ज्या अनुषंगाने 'शारिरीक वेदना' ही बाब दुखापतीच्या व्याख्येमध्ये मोडते. सबब, या प्रकरणामध्ये केवळ दुखापतीचे स्वरूप सिध्द झालेले नसले तरी दुखापत झालेली आहे हे कथन स्विकृत आणि सिध्द दोन्हीही आहे, असे या न्यायालयाचे मत आहे. सबब, आरोपीबाबत भारतीय दंड विधानाचे कलम ३२४ अन्वये गुन्ह्याची तत्वे वाजवी शंकेपलीकडे सिध्द झाली आहे.

**२५.** सदर प्रकरणामध्ये आरोपीविरुद्ध भारतीय दंड विधानाचे कलम ३२४ अन्वये गुन्हा केल्याचे दोषारोप आहे. भारतीय दंड विधानाचे कलम ३२४ अन्वये एखाद्या व्यक्तीने इच्छा परस्पर व हेतू पुरस्कर कुणालाही एखाद्या जीव घेणे हत्याराने दुखापत पोचवली असल्यास तो शिक्षेसपात्र असतो. सदर प्रकरणामध्ये वन नमुद केल्याप्रमाणे काठी ही लिंबाची काठी असून ती कुणाच्याही डोक्यावर मारल्यावर ती गंभीर इजा पोहोचवण्यास सक्षम आहे. या प्रकरणामध्ये फिर्यादी व त्यांचे साक्षीदार तसेच आरोपीने केलेला उलट

---
5 (1983) 2 SCC 174

तपास आणि कलम ३१३ (१ब) फौजदारी प्रक्रिया संहिता अंतर्गत नि.क्र. १९ अन्वये त्याचे स्वतःचे बयाण यावरून आरोपीने केलेले कृत्य हे त्यावेळी त्या दोघांमध्ये झालेल्या वादातून उत्पन्न झालेले होते आणि त्यावेळी फिर्यादीने त्याच्या व आरोपीच्या शेताच्या कारणावरून वाद झाला, हे दोन्ही पक्षांना स्वीकृत कथन आहे. त्याचप्रमाणे आरोपीने फिर्यादीला काठीने मारले असा पुरावा अभिलेखावर वाजवी शंकेच्या पलीकडे आलेला आहे. आरोपीने सदर कथन जरी फेटाळले असले तरीही त्याबाबत विसंगती उत्पन्न करण्यास तो सक्षम ठरलेला नाही किंवा आरोपीने अभियोग पक्षाच्या पुराव्यांमध्ये संशयात्मक बाबी आहेत, असे सिद्ध केलेले नाही. त्याचप्रमाणे या प्रकरणातील फिर्यादी व तपासी अधिकारी यांचे साक्ष कथन हे जसेच्या तसे अभिलेखावर स्थिर राहिलेले आहे आणि अभियोग पक्षाने इतर साक्षदारांच्या कथनामधील सिध्द केलेले विसंगत कथन हे दुजोरा देणारे आहे. अभियोग पक्षाने फिर्यादीचे कथन तसेच त्याबाबतचे इतर साक्षी पुरावे अभिलेखावर वाजवी शंकेपलीकडे सिद्ध केलेले आहे. सबब, सदर प्रकरणात अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ३२४ अन्वये आवश्यक असलेले घटक वाजवी शंकेपलीकडे सिद्ध केलेले आहे. म्हणुन, मुद्दा क्र. १ ला होकारार्थी उत्तर देण्यात येत आहे.

**मुद्दा क्रं. २ व ३ करीता –**

**२६.** मुद्दा क्र. २ व ३ हे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे त्यांचा निष्कर्ष एकत्रीत देण्यात येतो आहे.

सदर प्रकरणामध्ये आरोपीविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ५०४ व ५०६ सहकलम ३४ अन्वये देखील गुन्हा नोंदविण्यात आला व संपरीक्षा चालविण्यात आली आहे. अभियोग पक्षाने आरोपीविरुद्ध शिवीगाळ करणे तसेच जिवाने मारण्याची धमकी

दिल्याबाबत कथन आणि आरोप केलेले आहे. परंतु अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन केले असता आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली, याबाबत फिर्यादीची तक्रार नि.क्र.१० मध्ये नमूद असले तरीही फिर्यादी सा.क्र.३ विनोद शेगोकर नि.क्र. ०९ यांनी त्यांच्या सरतपासाणीत आरोपीने त्यांना कुठल्या प्रकारे शिवीगाळ केली तसेच कुठल्या प्रकारे त्यांना जिवे मारण्याची धमकी दिली, याबाबत साधा शब्दही उच्चारलेला नाही. तेच नव्हे तर, सा.क्र.२ चिणबाजी भोंडे नि.क्र.०७ व सा.क्र.४ शरद भोंबले नि.क्र.१२ जे अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे सदर प्रकरणातील प्रत्यक्षदर्शी साक्षदार आहेत त्यांच्या बयानामध्ये देखील जे या प्रकरणांमध्ये विसंगतीच्या स्वरूपात अभिलेखावर सिद्ध झालेले आहे, त्यात देखील आरोपीने फिर्यादीला कुठली शिवीगाळ केली तसेच कशाप्रकारे जिवे मारण्याचे धमकी दिली, याबाबत कुठलाही उल्लेख केलेला नाही. तसेच आरोपीने फिर्यादीला केलेले व्यक्तव्य हे इतके प्रकर्षक स्वरूपाचे होते की त्यामधून फिर्यादीच्या डोक्यामध्ये भीतीचा काहूर उत्पन्न झाला, असे दिसून येत नाही. अभियोग पक्ष सदर प्रकरणात आरोपीविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ५०४ व ५०६ अन्वये असलेले अनिवार्य असलेले घटक सबळ पुराव्यानिशी व शंकेच्या पलीकडे सिद्ध करण्यास अपयशी ठरले आहे. म्हणून, आरोपी सदर गुन्ह्यातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब, मुद्दा क्र.२ व ३ ला नकारार्थी उत्तर देण्यात येत आहे.

**मुद्दा क्रं. ४ करीता –**

**२७.** वर नमुद कारणे व निष्कर्षांच्या अनुषंगाने आरोपीविरुध्द भा.दं.वि. चे कलम ५०४ व ५०६ अन्वयेचा गुन्हा आकर्षित होत नसल्याने तो त्याकरिता निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. परंतु आरोपीविरुध्द भा.दं.वि. चे कलम ३२४ अन्वयेचा गुन्हा आकर्षित होत असल्याने आरोपीला सदर गुन्ह्याकरीता दोषी ठरविण्यात येते. तसेच आरोपीला भा.दं.वि. चे

कलम ३२४ अन्वयेच्या गुन्ह्याकरीता दोषी ठरविण्यात आल्याने तो शिक्षेस पात्र आहे. परंतु आरोपीला परिविक्षा अधिनियमाचा लाभ देणे अथवा आरोपी व त्याचे विद्वान वकिल आणि सहा. सरकारी अभियोक्ता यांचे शिक्षेबाबत म्हणणे ऐकण्याकरीता प्रस्तुत न्यायनिर्णय तहकुब करण्यात येत आहे.

MANGALA GAJANAN HIVARALE
Digitally signed by MANGALA GAJANAN HIVARALE
Date: 2026.07.28 15:51:37 +0530

स्थळ – वर्धा. (श्रीमती एम. आर. चव्हाण (हिवराळे))
दि. २८/०७/२०२६ न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
(२रे न्यायालय), वर्धा.

**न्यायनिर्णय पूर्ववत:**

**२८.** विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती कोठारी यांनी युक्तीवाद केला की, आरोपीने हेतुपूरस्पर फिर्यादीला डोक्यावर काठीने मारले. सदर कृत्य हे पुर्ण विचारांती व तयारीने करण्यात आले होते. यावरुन आरोपीचा फिर्यादीला दुखापत करण्याचा उद्देश स्पष्ट होता हे दिसून येते. त्यामुळे समाजाला संदेश मिळण्यासाठी त्यांनी आरोपीला जास्तीत जास्त शिक्षा देण्याची विनंती केली.

**२९.** त्याउलट आरोपीचे विद्वान वकिल श्री. हिवरे यांनी आरोपीविरुध्द सिध्द गुन्हा साध्या व किरकोळ स्वरुपाचा असून हा त्याचा प्रथम गुन्हा आहे. तसेच तो एक कौटुंबिक व जबाबदार नागरिक असून त्याचेवर कुटूंबाची जबाबदारी आहे. करिता त्याला कमीत कमी द्रव्यदंडाची शिक्षा देण्याची विनंती केली.

**३०.** सर्वप्रथम हे पाहणे आवश्यक आहे की, आरोपी हा परिवीक्षा अधिनियमाचा फायदा मिळण्यास पात्र आहे काय. आरोपीसंबंधी अपराधी परिविक्षा अधिनियमचा लाभ देणे

बाबत संबंधीत परिविक्षा अधिका–यांचा अहवाल (नि.क्र. २६) मागविण्यात आला असता त्यामध्ये आरोपीने परिविक्षा अधिका–यांना सहकार्य केलेले आहे, परंतु घटनेच्या दिवशी आरोपी व फिर्यादी यांच्यामध्ये हाणामारी झाली याबाबतचे कथन आरोपीने स्वतः स्वीकृत केलेले आहे. तसेच त्याने त्याबाबत हयगय व्यक्त केलेली आहे. फिर्यादी व आरोपी हे सख्खे भाऊ आहेत. मात्र, गुन्हा करतेवेळी आरोपीने त्यांचेतील नातेसंबंध विचारात घेतले नाही. आरोपीने फिर्यादीला केलेल्या मारहाणीचे स्वरूप देखील अत्यंत जिवनावश्यक अवयवावर *(vital part)* म्हणजेच डोक्यावर काठीने मारले आहे. त्यामुळे, प्रसंगी त्याचे जिवीतास धोका उत्पन्न होवू शकला असता. यावरून आरोपीची विपरित मनोवृत्ती व कायदयाची भिड न बाळगण्याचा बेगुमानपणा ठळकपणे दिसून येतात. या सर्व बाबींचा सारासार विचार करता आरोपी हा परिवीक्षा अधिनियमाचा फायदा मिळण्यास पात्र नाही, या निष्कर्षाप्रत हे न्यायालय आले आहे.

**३१.** मात्र, आरोपीची पार्श्वभूमी गुन्हेगारी स्वरूपाची नाही. सबब, तो अधिक काळ सराईत गुन्हेगारांच्या संगतीत राहील्यास त्याचे भवितव्य नष्ट होण्याचा संभव नजरेआड करता येणार नाही. तसेच, आरोपीचे वय देखील विचारात घेणे गरजेचे आहे. आरोपीला त्याने केलेल्या गुन्ह्याची जाणीव होवून त्याने गुन्हेगारी प्रवृत्तीस विन्मुख होणे आवश्यक आहे. त्यामुळे, शिक्षा ठोठावतांना सुवर्णमध्य गाठणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे दिलेली शिक्षा ही नगण्य असणे देखील योग्य नाही. आरोपीने सख्ख्या भावाला मारहाण करणे हे सामाजिकरित्या विपरीत उदाहरणे देणारे कृत्य आहे. त्याबाबत आरोपीला उदाहरणात्मक त्याचप्रमाणे प्रतिबंधात्मक शिक्षेचे सिध्दांत लक्षात घेवुन शिक्षा ठोठावणे अनिवार्य आहे. परंतु सदर सुवर्णमध्य गाठतांना आरोपीला वयाच्या ५७ व्या वर्षात तुरंगबंद करणे हे फक्त त्यालाच नव्हेतर त्याची सज्ञान मुले यांना देखील विपरित स्थितीत टाकणारे आहे आणि आरोपीचे

कृत्य हे सामाजिकरित्या त्याच्या परिवारास त्रास देणारे होवु शकते आणि ते दोन्ही भावामधील वैमन्यस्य टोकाला नेऊन जाणारे आहे. भा.दं.वि. कलम ३२४ अन्वये देण्यात आलेली शिक्षा ही ०३ वर्षाचा कारावास, किंवा द्रव्यदंड अथवा दोन्ही या स्वरुपाची आहे. त्यामध्ये कुठलीही कमीत कमी शिक्षा नमुद करण्यात आलेली नाही. त्याचप्रमाणे आरोपी हा शेतकरी आहे. त्याच्याकडे असलेले उत्पन्नाचे साधन आणि त्याची आर्थीक क्षमता विचारात घेण्यात येते. सबब, आरोपीला रक्कम रुपये ३०,०००/– द्रव्यदंडाची शिक्षा व न्यायालय उठेपर्यंतचा साधा कारावासाची शिक्षा सुनावणे न्यायोचित होईल.

**३२.** प्रस्तुत घटनेमुळे फिर्यादी विनोद शेगोकर यास शारीरिक व मानसिक वेदना सहन कराव्या लागल्या आहेत. तसेच, त्याला औषधोपचाराकरिता देखिल खर्च करावा लागलेला असणार आहे. सबब, फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३५७(१) नुसार विनोद शेगोकर यास शारीरिक, मानसिक व आर्थिक त्रासापोटी रुपये २५,०००/– नुकसान भरपाई देणे न्यायोचित होईल.

**३३.** सदर प्रकरणामध्ये सदर प्रकरणातील जप्त मुद्देमाल काडी मुल्यहीन असल्याने नाश करणे योग्य राहील. सदरहू हे न्यायालय मुद्दा क्र. ४ करीता पुढील आदेश पारित करीत आहे –

**आदेश**

१. आरोपी कृष्णा नामदेवराव शेगोकर याची फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ५०४ व ५०६ या गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपी कृष्णा नामदेवराव शेगोकर यास फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम

२४८(२) अन्वये भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ३२४ खालील गुन्ह्यात दोषी धरण्यात येते. आरोपीला सदर गुन्ह्याकरिता रक्कम रुपये ३०,०००/– (रुपये तीस हजार) द्रव्यदंडाची शिक्षा व न्यायालय उठेपर्यंतचा साधा कारावासाची शिक्षा ठोठावण्यात येत आहे. आरोपीने द्रव्यदंड न भरल्यास तो ०६ महिने साध्या कारावासास पात्र राहील. आरोपीला न्यायालयामधील कोर्ट मोहरार यांचे ताब्यात तात्काळ देण्यात यावे.

३. आरोपीला सदर प्रकरणामध्ये अटक करण्यात आल्या दिवशीपासुन ते त्याला जामीनावर मुक्त करण्यात आल्यापर्यंतचे कालावधीची वजावट फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४२८ नुसार आरोपीला फर्मावण्यात आलेल्या मुळ कारावासाच्या शिक्षेतून देण्यात यावी.

४. आरोपीव्दारे जमा करण्यात आलेल्या दंड रकमेपैकी रक्कम रुपये २५,०००/– (रुपये पंचवीस हजार) यातील फिर्यादी विनोद नामदेवराव शेगोकर यांना फौजदारी प्रक्रीया संहितेच्या कलम ३५७(१) नूसार देण्यात यावे.

५. आरोपीने त्याचे जामीन बंधपत्रास शरण यावे.

६. जप्त मुद्देमाल एक लाकडी काठी अपील कालावधी संपल्यानंतर नियमाप्रमाणे नाश करण्यात यावे.

७. या न्यायनिर्णयाची प्रत आरोपीला त्वरीत व विनामूल्य देण्यात यावी.

८. आरोपीला तो प्रस्तुत न्यायनिर्णयास आव्हान देवु शकतो याची समज देण्यात आली.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात पारित व अधिघोषित करण्यात आला.)

MANGALA GAJANAN HIVARALE
Digitally signed by MANGALA GAJANAN HIVARALE
Date: 2026.07.28 15:51:47 +0530

स्थळ – वर्धा. (श्रीमती एम. आर. चव्हाण (हिवराळे))

दि. २८/०७/२०२६ न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,

(२रे न्यायालय), वर्धा.

Certified that PDF copy of Judgment supra is word-to-word identical to the original Judgment.

( I.K.Khan )
Stenographer Grade-II